TATA

TATA POWER

# दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड

बॉम्बे हाऊस, २४, होमी मोदी स्ट्रीट, मुंबई – ४००००१, भारत,
दूरध्वनीः (९१ २२) ६६६५ ८२८२, फॅक्सः (९१ २२) ६६६५ ८८०१
सीआयएनः एल२८९२०एमएच१९१९पीएलसी०००५६७, वेबसाइटः **www.tatapower.com**

## जाहीर सूचना

**दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेडच्या पारेषण परवाना क्र. २०१४ च्या क्रमांक १ मधील चौथ्या बदल अर्जाबाबत सूचना/आक्षेप मागवणेबाबत**

**(खटला क्र. २०२४ चा १३ वा)**

१. दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड– पारेषण उद्योग (टीपीसी–टी) ने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगासमोर (एमईआरसी) विद्युत कायदा २००३ च्या कलम १८, तसेच एमईआरसी (व्यवसाय व्यवहार आणि शुल्क आणि आकार) विनियम २०२२ च्या विनियम ३९ आणि एमईआरसी (पारेषण परवाना अटी) विनियम २००४ च्या तरतुदींअंतर्गत, आपल्या पारेषण परवाना क्र. २०१४ चा १ मध्ये चौथ्या बदलासाठी अर्ज दाखल केला आहे. आयोगाने सदर अर्ज **२२ एप्रिल २०२४** रोजी दाखल करून घेतला असून टाटा पॉवर– टी ला कायद्याच्या कलम १८ (२) अंतर्गत जाहीर सूचना प्रकाशित करण्याचे निर्देश दिले आहेत.

२. टीपीसी–टीला विद्युत कायदा २००३ च्या कलम १४ अंतर्गत प्रदान करण्यात आलेला पारेषण परवाना क्र. २०१४ चा १ आणि त्यात वेळोवेळी करण्यात आलेला बदल हा पारेषण वाहिनी आणि उपसाधन संच विशिष्ट आहे. परवाना प्रदान केल्यानंतर, झालेल्या पारेषण वाहिन्या आणि उपसाधन संचाचे कार्यान्वयन/अकार्यान्वयन/फेरदुरूस्ती या कारणांमुळे परवान्यात बदल करणे आवश्यक आहे.

३. राज्य पारेषण संस्थेने आपल्या २८ फेब्रुवारी २०२४ रोजीच्या अहवालाद्वारे बदलासाठी प्रस्तावित केलेल्या यंत्रणांची पडताळणी केली आहे.

४. पारेषण परवान्यातील प्रस्तावित बदल किंवा सुधारणेमागील कारणमीमांसाः

अ) विद्यमान पारेषण वाहिनींमधील प्रस्तावित बदल –

- ➢ "प्रस्तावित– पारेषण वाहिन्यांची यादी" मधील ज्या पारेषण वाहिनीचे कार्यान्वयनानंतर "विद्यमान पारेषण वाहिन्यां" मध्ये रूपांतरण झाले आहे.
- ➢ विद्यमान पारेषण वाहिन्यांमध्ये/मधून पारेषण वाहिन्यांची भर/घट,
- ➢ जुन्या तेलाने भरलेल्या केबल्स बदलल्यानंतर पारेषण वाहिन्यांच्या लांबीत झालेला बदल.

ब) विद्यमान पारेषण उपसाधन संचामधील प्रस्तावित बदल –

- ➢ "प्रस्तावित उपसाधन संच यादी" मधील ज्या पारेषण उपसाधन संचाची कार्यान्वयनानंतर "उपकेंद्रांमधील विद्यमान उपसाधन संच" मध्ये रूपांतरण झाले आहे.
- ➢ विद्यमान पारेषण परवान्यामध्ये/मधून पारेषण उपसाधन संचाची भर/घट,
- ➢ टाटा पॉवरच्या निर्मिती उद्योगांमधील विजेच्या पारेषणासाठी वापरण्यात येणाऱ्या उपसाधन संचांचे हस्तांतरण.

क) "प्रस्तावित उपसाधन संच यादी" आणि "प्रस्तावित पारेषण वाहिन्यांची यादी" मधील प्रस्तावित बदल –

- ➢ "प्रस्तावित उपसाधन संच यादी" आणि "प्रस्तावित पारेषण वाहिन्यांची यादी" मध्ये त्यांच्या कार्यान्वयनानंतर अनुक्रमे "उपकेंद्रांमधील विद्यमान उपसाधन संच" आणि "विद्यमान पारेषण वाहिन्या" यात होणाऱ्या स्थलांतरामुळे बदल.
- ➢ आर्थिक वर्ष २०२२–२३ ते आर्थिक वर्ष २०२६–२७ साठी विद्यमान राज्य पारेषण संस्था पंचवार्षिक योजनेनुसार पारेषण नेटवर्कमध्ये प्रस्तावित योजनेसंदर्भातील केलेले नवीन बदल.
- ➢ आर्थिक वर्ष २०२२–२३ ते आर्थिक वर्ष २०२६–२७ साठीच्या नवीन राज्य पारेषण संस्था पंचवार्षिक योजनेचा भाग नसलेल्या परंतु आगामी पंचवार्षिक राज्य पारेषण संस्था योजनेत समावेश केल्या जाणाऱ्या ग्राहकांसाठी विश्वासार्हता सुधारणा आणि वीजपुरवठ्यासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या योजनांच्या संदर्भातील बदल.

५. तपासणी किंवा खरेदीसाठी अर्जाची प्रत मिळवता येईल अशा मुख्य अधिकाऱ्याचे संपर्क तपशीलः

अ. नावः **सौ. अपूर्वा शिंदे**

ब. अर्जाची प्रत तपासणी किंवा खरेदीसाठी खालील पत्त्यावरून घेता येईलः
**दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड, बॅक–बे रिसिव्हिंग स्टेशन, १४८ ले. जनरल जे. भोसले मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई– ४०००२१.**

क. तपासणी किंवा खरेदीसाठी कालावधीः **कार्यालयीन दिवसांत सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० पर्यंत.**

ड. अर्जाचे तपशीलवार दस्तऐवज (इंग्लिशमध्ये) रूपये १०० रोख किंवा मुंबई येथे देय असलेल्या **'दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड'** या नावे धनादेश/डीडीद्वारे भरून मिळवता येतील.

इ. अर्जाची प्रत खालील वेबसाइटवरून मोफत डाऊनलोड करता येईलः
**https://www.tatapower.com/investors/regulatory/regulatory-mumbai.aspx**

६. प्रकाशित केलेल्या जाहीर सूचनेअनुसार, ज्या लोकांना आपल्या सूचना/ आक्षेप सादर करायचे आहेत ते इंग्लिश किंवा मराठी भाषेत लिखित स्वरूपात एमईआरसी वेबसाइटवरील 'ई–पब्लिक कन्सल्टेशन' टॅबमार्फत (**www.merc.gov.in/e-public-consultation**) सादर करू शकतात. ही सुविधा वापरण्याबाबत कोणतेही अडथळे येत असल्यास संबंधित व्यक्ती एमईआरसी कार्यालयात, मोबाइल क्रमांकः ८९२८०७१५२२ वर किंवा suggestions@merc.gov.in या इमेल आयडीवर सर्व कार्यालयीन दिवसांत सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत संपर्क साधू शकतात.

७. ज्या व्यक्तिने 'ई– पब्लिक कन्सल्टेशन' टॅबवर सूचना/आक्षेप अपलोड केले आहेत, ते पुन्हा छापील स्वरूपात दाखल करण्याची गरज नाही. ज्या व्यक्तिंना इलेक्ट्रॉनिक माध्यम उपलब्ध नाही, ते त्यांच्या सूचना/आक्षेप छापील स्वरूपात सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केन्द्र क्रमांक १, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई– ४००००५ यांना संबोधित करून, श्री शंतनू सिंग, टाटा पॉवर समूह प्रमुख – विधी, टाटा पॉवर कंपनी लिमिटेड, बॅक बे रिसिव्हिंग स्टेशन, १४८ ले. जनरल जे. भोसले मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई–४०००२१, इमेलः shantanu.singh@tatapower.com यांच्या नावे सेवेच्या पुराव्यासह नोंदवू शकतात. त्यावर पाठवणाऱ्याचे पूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता आणि इमेल असल्यास तो नमूद करावा. **२४ मे २०२४ रोजी सायंकाळी ५:००** नंतर प्राप्त झालेल्या सूचना आणि/किंवा आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत. इतर कोणत्याही माध्यमातून पाठवलेल्या सूचना/आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत.

८. टीपीसी– टी प्राप्त झालेल्या सर्व आक्षेप/सूचनांना त्या प्राप्त झाल्यापासून तीन दिवसांच्या आत उत्तर देईल, ते दिनांक **२४ मे २०२४** पर्यंत प्राप्त झालेल्या सर्व आक्षेप/सूचनांना दिनांक **२७ मे २०२४** पेक्षा अधिक नसेल.

**स्थानः मुंबई** — **शंतनु सिंग,**
**दिनांकः २५ एप्रिल , २०२४** — **समूह प्रमुख–विधी**

**Size : 8cm(W) 21cm(H)**